# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.04.2026** **वार: बुधवार**

1. राज्यातील प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी काम करावं मुख्यमंत्र्यांचं आवाहन
2. बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार संपला; उद्या मतदान
3. राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्या संपाला संमिश्र प्रतिसाद आणि
4. भाजपा नेते, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं लातूर इथं निधन

**नागरी सेवा दिन**

राज्यातील प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी झिरो ब्युरोक्रसीची संकल्पना राबवण्याचा निर्धार काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नागरी सेवा दिनानिमित्त आयोजित राजीव गांधी प्रशासकीय गतीमानता-प्रगती अभियानाच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते काल बोलत होते. सुलभ प्रक्रिया, पूर्वानुमान आणि मानवी हस्तक्षेप कमी करुन पात्र नागरिकांना थेट सेवा देणं हेच झिरो ब्युरोक्रसी'चं मूळ तत्त्व आहे. झिरो ब्युरोक्रसी म्हणजे अधिकारी नसणे नव्हे, तर प्रक्रियांची पुनर्रचना करुन त्या अधिक सुलभ आणि पारदर्शक करणं आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. प्रशासनातील स्टार्ट अप संकल्पनेविषयी बोलताना ते म्हणाले.....

**ज्या ज्या विभागात आपण काम करतो तो तो केवळ विभाग नाही आहे ते एक स्टार्टअप आहे. अशा प्रकारचा विचार करून स्टार्टअप जसं ईज ओएफ लिव्हिंग आणत स्टार्टअप जसं एफिशियन्सी आणतं तशा पद्धतीच आपण स्टार्टअप म्हणून काम करतोय असं समजून आपल्याला जर आपण अशा प्रकारच्या संकल्पना राबवल्या आणि त्यातनं वेगवेगळ्या प्रकारच्या स्ट्रॅटेजीज वेगवेगळ्या प्रकारचे मॉड्यूल्स वेगवेगळ्या प्रकारचे त्या ठिकाणी सोल्युशन्स हे जर आपण तयार केले तर मला निश्चितपणे वाटत की हे जे काही झेरो ब्युरोक्रसी कडे आपल्याला जायचं आहे आणि लोकांना एक अतिशय पारदर्शी अशा पद्धतीचं जे सरकार द्यायचं आहे ते देण्यामध्ये आपल्याला निश्चितपणे मोठा या ठिकाणी फायदा होईल.**

महाराष्ट्र आता जागतिक पातळीवर स्पर्धा करत आहे असं सांगून आत्ता राज्याची अर्थव्यवस्था जगात 30व्या क्रमांकावर आहे, आगामी काळात ती आणखी बळकट होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.
सचिव डॉ. रामास्वामी एन, डॉ किरण कुलकर्णी यांच्यासह विविध ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांना यावेळी विविध श्रेणीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार देण्यात आले.

**पोटनिवडणूक**

बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. दरम्यान, काल प्रचाराच्या शेवटच्या दिवशी बारामती इथं राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांची प्रचारसभा झाली. या सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, उदय सामंत आणि रामदास आठवले यांच्यासह महायुतीतील अन्य नेते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे देखील प्रचारसभेला उपस्थित होत्या. दरम्यान प्रकृती अस्वास्थ्यामुळे आपण मुंबईबाहेर जाऊ शकत नसून नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावता येणार नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखेपाटील, मंत्री पंकजा मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर आणि अन्य नेत्यांनी प्रचारसभा घेतल्या. उद्या होणाऱ्या मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. राहुरीमध्ये 374 मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतदान कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि अन्य साहित्य त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवरच थेट उपलब्ध करून दिलं जाणार आहे.

**पहलगाम हल्ला**

जम्मू आणि काश्मीर मधल्या पहलगाम इथं  झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण होत आहे.
गेल्या वर्षी याच दिवशी पहलगाम इथं दहशतवाद्यांनी 26 निरपराध लोकांची हत्या केली होती, यामध्ये प्रामुख्यानं पर्यटकांचा समावेश होता. या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सशस्त्र दलांनी गेल्या वर्षी 6 आणि 7 मेच्या मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत नियंत्रण रेषेच्या पलीकडं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर मधल्या दहशतवाद्यांच्या नऊ छावण्यांवर अचूक मारा केला. या कारवाईत शंभरहून अधिक दहशतवादी ठार झाले.

**नारीशक्ती**

नारीशक्ती वंदन घटना दुरुस्ती विधेयकाला विरोधकांनी विरोध केल्याच्या निषेधार्थ मुंबईत भाजपने काल जनआक्रोश मोर्चा काढला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत त्याचा समारोप झाला. काँग्रेस आणि त्यांच्या सहकारी पक्षांनी कायमच महिला आरक्षण आणि सक्षमीकरणाला विरोध केला; मात्र लोकसभा आणि विधीमंडळांमध्ये महिलांना आरक्षण मिळवून दिल्याशिवाय ही लढाई थांबणार नाही, असा निर्धार मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

दरम्यान महिलांना संसद आणि विधिमंडळात 33 टक्के आरक्षण तातडीनं लागू करावं अशी मागणी काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे. तर महिला आरक्षण विधेयकाच्या आडून, सीमांकन विधेयक आणण्यात संसदेच्या जागा अशास्त्रीय पद्धतीनं वाढवण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न होता, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद्चंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी काल पुण्यात वार्ताहर परिषदेत केला.

**संप**

राज्य सरकारी कर्मचारी संघटनेनं आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुकारलेल्या संपाला काल विविध जिल्ह्यात संमिश्र प्रतिसाद मिळाला. विविध ठिकाणच्या जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर कर्मचाऱ्यांनी आंदोलन आणि निदर्शनं केली.
जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करा, अनुकंपाची भरती तात्काळ करा, निवृत्तीचे वय वाढवा यासह अन्य काही मागण्यांसाठी कर्मचारी संघटनेनं हा बंद पुकारला आहे. दरम्यान, संपावर गेलेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक पातळीवर चर्चा सुरू आहे मात्र काही आव्हानांमुळे निर्णयासाठी  वेळ लागेल, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपूर इथं सांगितलं.

**वसुंधरा दिन**

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त राज्य शासनाच्या पर्यावरण विभागातर्फे आज विविध उपक्रमांचा प्रारंभ करण्यात येणार आहे. वसुंधरा रक्षक अभियानाचा आणि प्लॅस्टिक बाटल्यांच्या संकलनासाठीच्या अभियानाचा प्रारंभ आज होणार आहे. तसंच राज्य पर्यावरण कृती कक्षाच्या संकेतस्थळाचं आणि बोधचिन्हाचं अनावरणही केलं जाणार आहे.

**वारी बैठक**

आषाढी वारी सोहोळ्यातील वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी पालख्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या संदर्भात काल मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत बैठक झाली. पालखी सोहळ्याच्या विश्वस्तांशी चर्चा करून त्यांना आणखी कोणत्या सुविधा हव्यात हे विचारुन त्याही करून द्याव्यात असंही त्यांनी सांगितलं.

**पोषण पंधरवडा**

महिला आणि बाल विकास विभागाअंतर्गत राबवण्यात येत असलेल्या आठव्या राष्ट्रीय पोषण पंधरवडयातील जनजागृती उपक्रमामध्ये अहिल्यानगर जिल्ह्याला देशात प्रथम क्रमांक मिळाला असून जिल्ह्यानं आतापर्यंत 3 लाख 24 हजार 75 उपक्रमांची नोंद केली आहे. तर पुणे जिल्ह्यानं देशात दुसरा क्रमांक पटकावला असल्याचं जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितलं. 'बालकांच्या जीवनातील पहिल्या 6 वर्षातील मेंदूचा विकास' या मुख्य संकल्पनेवर यंदाचा पंधरवडा केंद्रित आहे.

**महिला आयोग**

कायद्यावरचा आणि व्यवस्थेवरचा विश्वास वाढणं अत्यंत आवश्यक असून तो अधिक चांगल्या पद्धतीने वाढण्यासाठी महिला आयोगाच्या सुनावणीद्वारे मदत होईल असा विश्वास राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला. 'राष्ट्रीय

महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमा अंतर्गत काल नवी मुंबईत महिला जनसुनावणीचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी त्या बोलत होत्या.

**रॅली**

नाशिक इथं कुंभमेळ्याच्या निमित्तानं तपोवन आणि शहरातील काही भागात रस्ता रुंदीकरणासाठी वृक्षतोड करावी लागणार आहे. त्याला विरोध करण्यासाठी पीपल्स ट्री सिटीझन मूव्हमेंटतर्फे काल शहरात 'ऑक्सीजन रॅली' काढण्यात आली.

**फटाके स्फोट**

पालघर जिल्ह्यात वाडा तालुक्यातल्या कोणसई गावात फटाके बनवणाऱ्या कंपनीत काल दुपारी भीषण स्फोट झाला. या स्फोटात दोन कामगारांचा मृत्यू झाला. तर चार कामगार जखमी झाले आहेत.

**केरळ स्फोट**

केरळमध्ये त्रिसुर जिल्ह्यात मुंडाथिकोड इथं फटाक्यांच्या कारखान्यात काल स्फोट झाला. या स्फोटात 13 कामगारांचा मृत्यू झाला; तर अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत.

**निधन गोपाळराव पाटील**

भाजपा नेते, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं काल लातूर इथं निधन झालं. ते 94 वर्षांचे होते.
डॉ. पाटील यांनी शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि समाजकार्य क्षेत्रांत मोलाचं योगदान दिलं. लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माध्यमातून लातूर पॅटर्न उभा करण्यात त्यांचे मोठे योगदान होते. या लातूर पॅटर्नच्या माध्यमातून अनेक गुणवंत विद्यार्थी घडले.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गोपाळराव पाटील यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**पाऊस**

राज्यात एकीकडे उन्हाची काहिली वाढत असतानाच काही जिल्ह्यांमध्ये पावसाचीही नोंद झाली.
काल राज्यात सर्वाधिक कमाल तापमान अमरावती इथं 43 अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. तर सांगली आणि सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या काही भागात काल वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे शेतपिकाचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

धाराशिव जिल्ह्यातही काल वादळी पाऊस झाला. वीज पडून एकाचा मृत्यू झाला.

**हवामान**

आज कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, वीजा आणि वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.